# सातारा जिल्हा परिषद,सातारा - शिक्षण विभाग (प्राथमिक)

शिक्षणाधिकारी(प्राथ.) ०२१६२- २३४८०७
फॅक्स नंबर -
ई-मेल -.com@rediffmail ssasatara1

जिल्हा परिषद मुख्य इमारत, दुसरा मजला,
सातारा-कोरेगाव रोड, सदरबझार,सातारा
तालुका जिल्हा - सातारा.

जा.क्र/शिक्षण/प्रशा-१३/प्र.शा मा/६७६५/२०२०
दिनांक- २८/१२/२०२०

प्रति,

**अध्यक्ष/सचिव**
**पोदार एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टस ट्रस्ट मुंबई,**
**पोदार इंटरनॅशनल स्कूल,कोपर्डे हवेली ता.कराड जि.सातारा.**

**विषय :-** महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रथम मान्यता देण्याबाबत

संदर्भ :- १.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२
२.केंद्रीय माध्यमिक शिक्षण विभाग दिल्ली यांचेकडील सीबीएसई/एएफएफ/११३०४१९/ ईएक्स-००४५०-१६१७/२०१६/११००६६ दि.१६/०७/२०१६
३. महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१५/०१/२०१० रोजीच्या ना हरकत प्रमाणपत्र.

उपरोक्त विषयांसदर्भात वरील संदर्भिय क्र.२ व ३ अन्वये **पोदार एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टस ट्रस्ट मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल,कोपर्डे हवेली ता.कराड जि.सातारा** यांना **इंग्रजी (सी.बी.एस.ई.)माध्यमाची प्राथमिक ते उच्च माध्यमिक विज्ञान (इयत्ता १ ली ते १२ वी ) नवीन स्वंयअर्थसहाय्यित** तत्वावरील शाळा सुरु करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. शाळेस **सन २०१६-१७** या शैक्षणिक वर्षापासून संदर्भ क्र.०२ व ०३, मा.केंद्रीय माध्यमिक शिक्षण विभाग दिल्ली यांचे कार्यालयाकडील परवानगी आदेशामध्ये नमुद केलेल्या अटी,शर्ती तसेच खालील नमूद केलेल्या तसेच खाली नमुद अटींच्या अधिन राहून स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर प्राथमिक शाळेस प्रथम मान्यता देणेत येत आहे.

१. सदर वर्गांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
३. विहीत निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ति करावी.
४. मा.संचालक (माध्य व उच्च माध्य) यांचे दिनांक २०.०११.२०१३ चे परिपत्रकानुसार आपणास प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांना मंजूरी देण्यात येत असून नवीन प्रस्तावित जागेंत १८ महीन्याच्या आत शाळा सुरु करण्याच्या अटींवर प्रथम मान्यता आपोआप रद्द होईल.
५. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घ्यावी.
६. शैक्षणिक शुल्क विहीत कार्यपदधतीचा अवलंब करुन आकारण्यात यावे
७. विहीत संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
८. शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश,सुचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे तसेच तसेच वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पुर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधीन राहून मान्यता चालु ठेवता येईल. परंतू प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतील जाईल याची नोंद घ्यावी.

Prabha
(प्रभावती कोळेकर)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**सातारा जिल्हा परिषद सातारा**

**प्रत :-** गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती **कराड**
२/- पुढील तपासणीचेवेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत अहवाल द्यावा.
**प्रत :-** मुख्याध्यापक ,पोदार इंटरनॅशनल स्कूल,कोपर्डे हवेली ता.कराड जि.सातारा यांना माहितीसाठी.

**Principal**
**Podar International School**
**Koparde Haveli, Karad -415115**

Col Shirish P Kulkarni (Retd)
**General Manager**
**Podar Group of School**
**Kolhapur HUB Region**